# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **30/09/2022**

**Brief of the work done :-**

सराईत गुन्हेगाराला ठोकल्या बेड्या ; 02 लाखांच्या 04 मोटारसायकली जप्त.

## डी.बी. स्कॉडची कारवाई

# सराईत गुन्हेगाराला ठोकल्या बेड्या

### २ लाख १०हजार किमतीच्या ४ मोटार सायकल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ■ शहरात चोरीस गेलेल्या २ लाख १० हजार किमतीच्या चार मोटर सायकली जप्त करण्यात आहेत. दरम्यान २९ सप्टेंबर पोलीस स्टेशन, वाशिम शहर डी.बी. पथकाने ही कारवाई करुन मोटारसायकल चोरट्याला अटक केली.

या बाबत मिळालेली माहिती अशी की, २७ सप्टेंबर रोजी फिर्यादी विनोद भिकाजी राउत, वय ३२ वर्ष, धंदा-नोकरी, रा. कळंबा महाला यांनी पोलीस स्टेशन, वाशिम शहर येथे येउन फिर्याद दिली होती की, त्यानी त्याची होंडा शाईन कंपनीची एम.एच. ३७ एस. ६९४६ या क्रमांकाची मोटार सायकल २५ सप्टेंबर रोजी महात्मा फुले भाजी



मार्केट, पाटणी चौक, वाशिम येथे पार्क केली व ते भाजीपाला घेण्यासाठी गेले. त्यानंतर फिर्यादी हे त्यांनी ठेवलेल्या मोटारसायकल जवळ आले असता त्यांना त्यांची मोटारसायकल त्यांनी लावलेल्या ठिकाणी मिळून न आल्याने त्यांच्या लक्षात आले की, कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांची मोटारसायकल चोरून नेली आहे. त्यानंतर फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन वाशिम शहर येथे दिलेल्या रिपोर्ट वरूनकलम ३७९ भा.दं.वि. अन्वये दाखल करण्यात आला. त्यानंतर डिबी पथक, वाशिम शहर यांना मिळालेल्या गोपनिय माहितीवरून व सि सी टि व्ही फूटेजच्या आधारे इसम नामे समाधान पायरू कांबळे, वय २८ वर्षे, रा. तामसाळा, यास ताब्यात घेवून त्याच्याकडे कसून चौकशी केली असता त्याने वाशिम शहरातून एकूण ०४ मोटारसायकल चोरल्याची कबुली दिली. नमूद आरोपीस अटक करून त्याच्या कडून एकूण २ लाख १० हजार रुपये किंमतीच्या ४ मोटारसायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक बच्चन सिंह सो., अपर पोलीस अधिक्षक गोरख भामरे सो., उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिलकुमार पुजारी सो. यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार शेख यांच्या नेतृत्वाखाली डि.बी. पथकाचे सपोनि खंदारे, लालमणी ठाणेदार श्रीवास्तव, माराता भवाळ,मंगेश मालवे. रामकला र ज्ञानदव मात्र, विठ्ठल महाले व संदीप वाकडकर यांनी पार पाडली (जि.प्र.)

■ यामध्ये एक होंडा शाईन कंपनीची एम.एच. ३७ एस. ६९४६ या क्रमांकाची मोटारसायकल, किंमत ६० रुपये,एक हिरो होंडा स्प्लेंडर कंपनीची एम.एच. ३७ ए.सी. या कमांकाची मोटारसायकल किंमत ६० रुपये, एक हिरो पॅशन एक्स. प्रो कंपनीची एम.एच. ३७ एम. ९६३० कमांकाची मोटारसायकल किंमत ५० रुपये व एक बजाज प्लॅटिना कंपनीची एम.एच. ३७ डी. ६१९९ या कमांकाची कमांकाची मोटारसायकल किंमत ४० हजार रुपये नामे समाधान पायरू कांबळे, वय २८ वर्षे, रा. तामसाळा, ता.जि. वाशिम याच्या कडून एकूण ४ गुन्हे उघडकीस आले आहेत.